**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१७००५६२५ /२०२५ पिंपरी-चिंचवड दिनांक-२९ /०१/२०२५

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक ३१/०१/२०२५ रोजी भारत विरुद्ध इंग्लंड ४ था टी २० क्रिकेट सामना पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीतील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे गहुंजे स्टेडीयमवर होणार आहे. सदर सामना पाहणेकरीता प्रेक्षक खाजगी वाहनांनी मोठ्या प्रमाणात येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे .

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### देहुरोड वाहतूक विभाग

❖ ज्या वाहनधारकांकडे (व्ही.व्ही.आय.पी/व्ही.आय.पी/इतर अत्यावश्यक सेवा) वाहनाचा पास असेल अशा वाहनांना स्टेडियमकडे जाताना द्रुतगती महामार्गाच्या उजव्या बाजूच्या सेवा मार्गाचा पर्याय देण्यात येत आहे.

**१) मुंबईकडून येणा-या प्रेक्षकांच्या वाहनांसाठी मार्ग खालील प्रमाणे**

अ) द्रुतगती मार्गाचे देहुरोड एक्झिट मधून डावीकडे वळावे त्यानंतर तात्काळ परत डावीकडे वळून एक्सप्रेस हायवे लगतच्या मामुर्डीगावाचे बाजुस असलेल्या सर्विस रोडने स्टेडियमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

ब) द्रुतगती मार्गावरुन येणारी वाहने किवळे ब्रिज वरुन मुकाई चौक येथुन यु टर्न घेऊन कृष्णा चौक मार्ग एक्सप्रेस लगतच्या सिम्बॉयसेस कॉलेजच्या बाजुकडील असलेल्या सर्विस रोडने स्टेडियमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

क) शितलादेवी मंदीर येथुन डाव्या बाजुस वळवून लेखा फार्म मार्गे असलेल्या सर्विस रोडने स्टेडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करावा.

ड) सेंट्रल चौक मार्गे मुकाई चौकात येणारी वाहने किवळे ब्रिज खालून कृष्णा हॉटेल शेजारुन मामुर्डी अंडर-पासचे डाव्या बाजूने अथवा एमएच ०४ बोगद्यातून डावीकडे वळून कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

ई) जुन्या मुंबई-पुणे हायवेने येणारी वाहने सेंट्रल चौक येथून यु टर्न घेवून साई नगर फाटा मार्गे पार्किंग ठिकाणी जातील.

**मनाई :- जुना मुंबई पुणे हायवेने येणारी वाहने सोमाटणे फाटा, सेंट्रल चौक मार्गे बेंगलोर हायवे वरील मामुर्डी जकातनाका जवळील अंडरपास व रस्त्याने येणारे प्रेक्षकाच्या वाहनांना शितलादेवी मंदीर येथून मामुर्डी गावात येण्यास बंदी करण्यात येत आहे.**

**२) पुणे बाजुकडून येणा-या प्रेक्षकांच्या वाहनांसाठी मार्ग खालील प्रमाणे**

अ) पुणे बंगलोर महामार्गावरुन पवनानदी ब्रिज, हॉटेल सॅन्टोंसा पास करुन किवळे ब्रिज वरुन वाहने डाव्या बाजुकडे वळवावी व २०० मिटर वरुन द्रुतगती मार्गाचे डाव्या बाजुने असलेल्या सर्विस रोडने स्टेडीयमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करतील.

ब) निगडी, हँगिंग ब्रिज कडून येणारे प्रेक्षकांची वाहने रावेत चौक, भोंडवे चौक, मुकाई चौक मार्ग कृष्णा चौक येथुन उजव्या बाजुस वळुन परत एक्सप्रेस हायवे पासून डाव्या बाजुस वळुन असलेल्या सर्विस रोडने स्टेडियमकडे व पार्किंगकडे जाण्याच्या मार्गाचा अवलंब करतील.

क) गहुंजे पुल ते वाय जंक्शन मार्गे स्टेडियमकडे फक्त कार पासधारक वाहनांना तसेच अत्यावश्यक सेवेतील

Scanned with OKEN Scanner

वाहनांना प्रवेश देण्यात येईल.

१)मामुर्डी गावातील रुहिझ बिर्यानी ते मासुळकर फार्म बाजुकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने मामुर्डी जकातनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) मरीमाता चौक किवळे नाला येथुन मासुळकर फार्म बाजुकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने कृष्णा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२)सामना संपल्यानंतर मुकाई चौक बसस्टॉप कडुन किवळे अंडरपासमार्गे मुंबई तसेच किवळे बाजुकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतूकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदर मार्गावरील वाहने मुकाई चौक येथून डावीकडे वळून समीर लॉन्स- किवळे गाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

- **मामुर्डी ते कानेटकर बंगला तसेच मामुर्डी ते गहुंजे स्टेडीयम कडे जाण्या-येण्यास सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना दिनांक ३१/०१/२०२५ रोजी १५.०० ते २४.०० वाजेदरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.**
- **कृष्णा चौक ते मामुर्डी अंडरपास मार्गे तसेच जुन्या पुणे - मुंबई महामार्गाचे शेजारील मामुर्डी गावचे बाजुस असलेल्या सर्विस रोडने गहुंजे स्टेडीयम कडे जाण्या-येण्यास सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना दिनांक ३१/०१/२०२५ रोजी १५.०० ते २४.०० वाजेदरम्यान प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

तरी वरीलप्रमाणे दिनांक ३१/०१/२०२५ रोजी १५.०० ते २४.०० वाजे दरम्यान गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे स्टेडियमवर होणाऱ्या भारत विरुद्ध इंग्लंड टी २० क्रिकेट सामन्याचे अनुषंगाने आवश्यकतेनुसार वाहतूक मार्गात बदल करण्यात येत आहे.

**आवाहन :- १. वाहनचालक दिलेल्या मार्गाचाच वापर करतील. कोणीही मामुर्डी गावातील अंतर्गत रस्त्यांचा वापर करु नये.**

**२. स्टेडियमकडे जाणारे सेवा रस्ते अतिशय अरुंद असल्यामुळे वाहनचालकांनी डबल लेन/ ओव्हरटेकिंग न करता सिंगल लेनमध्ये वाहने चालवून सहकार्य करावे.**

२९/०१/२०२५

(बापू बांगर)
पोलीस उपायुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **देहुरोड** वाहतुक विभाग,

/- सदर अधिसुचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner